# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०९/२०२४ (मंगळवार) सकाळ**


---

## पो.स्टे. कळमेश्वर हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०१/०९/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मौजा सावंगी गावात डोंगरे ले आउट येथील खाली प्लॉट मध्ये काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी मौजा सावंगी गावात डोंगरे ले आउट येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) संदीप चैतराम कोपोले, वय ३१ वर्ष रा सावंगी कळमेश्वर, २) नवशाद रशीद शेख वय ३५ वर्ष रा. उपरवाही, ३) अश्विन श्रीराम गौतम, वय ३० वर्ष रा, सावंगी ता. कळमेश्वर, ४) फिरोज इब्बु शेख वय ३७ वर्ष रा. उपरवाही ता. कळमेश्वर, ५) नितीन परसराम राउत वय ३७ वर्ष रा. सावंगी, ६) खुशाल किसनाजी मस्के वय ३३ वर्ष रा. सावंगी ता कळमेश्वर, ७) बंसल राजेश डेहरिया वय २४ वर्ष रा. सावंगी ता कळमेश्वर, ८) अविनाश श्रीराम गौतम वय २८ वर्ष रा. सावंगी कळमेश्वर, ९) ग्यानदेव नामदेव दिगेकर वय ४५ वर्ष रा. सावंगी ता. कळमेश्वर** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०९ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन डावावर असलेले ५२ ताश पत्ते, नगदी ९,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबांडे, पोउपनि मनोज टिपले, दत्तात्रय कोलते, पोना दिनेश गाडगे, पोअं. हितेंद्र चौधरी यांनी पार पाडली.

# गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक ०१/०९/२०२४ रोजी ०८.३० वा. दरम्यान मौजा ईटगाव येथे फिर्यादी नामे– रोशन हरीदास सनेसर, वय ३४ वर्ष रा. ईटगाव ता. पारशिवनी व **आरोपी नामे– मनीष केशवराव येवले वय २४ वर्ष रा. ईटगाव ता. पारशिवनी जि नागपुर** हे एकाच गावातील असुन यातील आरोपी हा फिर्यादी जवळ आला व तु कंपनीमध्ये असे सांगितले की, मी बाहेर पत्ते खेळत होतो. असे ठेकेदाराला सांगुन माझी बदनामी केली असे बोलुन फिर्यादीस शिवीगाळ करून आरोपीने आपल्याजवळील एक धारधार शस्त्र काढुन अचानक फिर्यादीवर हल्ला केल्याने फिर्यादिचा कान तुटला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून आरोपीविरूद्ध पोस्टे पारशिवनी येथे कलम ११८ (२), ३५२ बी एन एस अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीस अटक केली आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार राजेशकुमार थोरात, पोउपनि शिवाजी भताने, पोअं विरेंद्रसिंग चौधरी यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर